MHRG170003062022

**<u>जिल्हा न्यायालय–१ पनवेल–रायगड यांचे न्यायालयात</u>**
**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३/२०२२ मधील नि.क्र.३७ वरील आदेश</u>**

**<u>वैदेही म्हात्रे वि.हर्षवर्धन म्हात्रे</u>**

१) प्रस्तुत अर्ज सामनेवाला याने दाखल केला आहे. सामनेवाला क्र.१ याने नि.क्र.२५ वर अज्ञान मुलगा प्रियांश याचा दोन दिवस ताबा मिळावा म्हणुन अर्ज केला होता त्यावर न्यायालयाने अज्ञानाची भेट आठवडयातुन दोनदा त्रयस्थ ठिकाणी मंजुर केली. त्याप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांनी विमल तलाव गार्डन येथे १०/०२/२०२३ व दिनांक ११/०२/२०२३ रोजी अज्ञानाची भेट घेतली. दिनांक २४/०२/२०२३ रोजी अज्ञान मुलगा आजारी असुन त्याला धुळीचा त्रास होत आहे असे पत्र अर्जदाराने सामनेवाल्यास पाठविले. सबब सामनेवाला मागणी करतो की, अज्ञान मुलगा याचे आठवडयातुन दोन दिवस, तीन तासाकरीता त्याच्या स्वतःच्या घरी भेट घेण्याची परवानगी दयावी.

२) अर्जदार हिने म्हणणे दिले की, नि.क्र.२५ वरील आदेशाचे ती पालन करीत आहे. मुलगा प्रियांश याची तब्येत बरी नसल्याने तिने असमर्थतता दाखवली होती. ती नि.क्र.२५ वरील आदेशाचे पालन करण्यास तयार आहे.

३) सामनेवाला यांच्या वतीने विधिज्ञ हृदयनाथ म्हात्रे यांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार हिचे विधिज्ञ गैरहजर.

४) नि.क्र.२५ वरील आदेश हा अज्ञानाचे हित लक्षात घेउन मी पारित केला होता. तत्पूर्वी उभय पक्षकारांना वैकल्पिक वाद निवारण प्रक्रियेतील मध्यस्थी याद्वारे अज्ञान मुलाच्या भेटीबाबत, सामोपचाराने निर्णय घ्यावा असे सांगितले परंतु मध्यस्थी प्रक्रिया यशस्वी झाली नाही. तद्नंतर सामनेवाल्याची नि.क्र.२५ वरील मागणी होती की, अज्ञान मुलाला आठवडयातुन दोनदा त्याच्या घरी आणुन भेट दयावी. याबाबत नि.क्र.२५ वर आदेश करताना मी निरीक्षण केले की, सामनेवाला क्र.१ हा केवळ दोन वर्षाचा आहे. मुळ अर्जदार हिचे सासुसासरे आजारी रहातात. दुर्देवाने ही मान्य वस्तुस्थिती आहे की सामनेवाला क्र.१ यास अर्धांगवायुचा आजार आहे. त्यामुळे अज्ञानाची भेट त्रयस्थ ठिकाणी व्हावी असा आदेश केला.

५) आता सामनेवाले हे कथन करतात की अज्ञान यास दम्याचा त्रास आहे व बाहेर त्रयस्थ ठिकाणी भेटणे शक्य नाही. याकरीता सामनेवाला यांनी काही छायांकित कागदपत्रे दाखल केली आहेत. असे जरी असले तरी, यापूर्वी नि.क्र.२५ वरील आदेश हा अज्ञानाचे हित लक्षात घेउन केला होता, त्यावेळी सामनेवाल्याच्या घरी अज्ञानास पाठविण्याबद्दल मी नकारात्मक निरीक्षण केलेले होते. त्यामुळे आता पुन्हा मला तसा आदेश करता येणार नाही. अर्जदार व सामनेवाले यांना पुन्हा सूचित करण्यात येते की त्यांनी वैकल्पिक वाद निवारण प्रक्रियेतील, एखादया प्रक्रियेचा अवलंब करुन अज्ञान मुलगा चिरंजीव प्रियांश याचे हित जोपासले जाईल हे पहावे.

६) वरील निरीक्षण करुन नि.क्र.३७ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

JAIRAJ DATTATRAYA WADNE

Digitally signed by JAIRAJ DATTATRAYA WADNE
Date: 2023.04.03 17:48:44 +0530

पनवेल ( जयराज द.वडणे )
दिनांक :– ०३/०४/२०२३ जिल्हा न्यायाधीश–१ पनवेल–रायगड

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | S.J.Sheth |
| Name of the Court | : | Additional Sessions Judge, Panvel Raigad |
| Dictation given on | : | 03/04/2023 |
| Order signed by the P.O.on | : | 03/04/2023 |
| Order uploaded on | : | 03/04/2023 |